
ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

(महाराष्ट्र शासनाने वर्ष १९८९ मध्ये स्थापिलेले)
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२२२२
ई-मेल : kusumagrajchair@ycmou.ac.in


**डॉ. दिलीप धोंडगे**
प्रमुख
कुसुमाग्रज अध्यासन



**कुसुमाग्रज अध्यासन**

# अहवाल

## नववर्षाच्या स्वागताप्रीत्यर्थ व स्व. भाऊसाहेब पाटणकर यांचे स्मरणार्थ ‘मराठी शेरो-शायरी’ सादरीकरण कार्यक्रम



# कार्यक्रमाची रूपरेषा

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत**

डॉ. दिलीप धोंडगे, प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन

वेळ : दु.०४:०० ते ०४:१५

---

**अतिथी श्री. मुंकुंद दीक्षित यांचे स्वागत व सत्कार**

मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन आणि

मा. कुलसचिव श्री. दिलीप भरड सर

वेळ : दु.०४:१५

---

**गझल कार्यक्रमाचे सादरीकरण**

श्री. मुकुंद दीक्षित

वेळ : दु.०४:२० ते दु.०५:१०

---

**अध्यक्षीय भाषण**

मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर

वेळ : दु.०५:१५ ते दु.०५:३०

---

**आभार**

डॉ. दिलीप धोंडगे, प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२

जावक क्र. : यचममुवि/KAC/2025/ दिनांक : 31/ 12/2024

## परिपत्रक

नववर्षाच्या निमित्ताने व मराठी शायरीचे नामवंत शायर स्व. भाऊसाहेब पाटणकर यांचे स्मरणार्थ **श्री. मुकुंद दीक्षित** यांचा गझल सादरीकरणाचा कार्यक्रम मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली **बुधवार दि. ०१ जानेवारी २०२५ रोजी दु. ठीक ०३:३० ते ०५:३०** या वेळेत शैक्षणिक इमारतीतील सभागृहात आयोजित केला आहे. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून मा. प्र-कुलगुरु प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन व मा. कुलसचिव डॉ. दिलीप भरड उपस्थित राहणार आहेत. कृपया विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२ २२२

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव- मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा संचालक, विभाग, केंद्र, कक्ष व विभागीय केंद्र प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावे.

# 'मराठी शेरो-शायरी' सादरीकरण कार्यक्रम

**दिनांक :** ०१ जानेवारी २०२५
**स्थळ :** शैक्षणिक सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
**आयोजक:** कुसुमाग्रज अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**प्रस्तावना**
नववर्षाच्या स्वागताप्रीत्यर्थ आणि मराठी शायर कवी स्वर्गीय भाऊसाहेब पाटणकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने *"मराठी शेरो-शायरी"* या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेला उजाळा देणारा हा कार्यक्रम बुधवार, दि. १ जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारत सभागृहात पार पडला.

**कार्यक्रमाचे तपशील**
कार्यक्रमाचे सादरीकरण मालेगाव येथील एकपात्री कलाकार श्री. मुकुंद दीक्षित यांनी केले. त्यांनी आपल्या मनमोहक सादरीकरणात मराठी शेरो-शायरीच्या माध्यमातून रसिकांना भावविभोर केले.
दीक्षित यांनी आपल्या निवेदनात *"अमृतातेहि पैजासी जिंकणारी मराठी भाषा"* असल्याचे सांगितले. तसेच, मराठी शेरो-शायरी हा अलीकडच्या काळातील काव्यप्रकार असला तरी भावगीत, भक्तिगीत, गवळण, बालगीत, बडबडगीत, प्रेमगीत, लावणी, जपानी हायकू अशा विविध प्रकारांमुळे मराठी भाषा अधिकाधिक समृद्ध होत गेल्याचे त्यांनी नमूद केले.
विशेषतः कार्यक्रमात स्व. भाऊसाहेब पाटणकर यांच्या काही निवडक शेरो-शायरींचे सादरीकरण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

**मान्यवरांची उपस्थिती**
कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी भूषविले. त्यांनीही आपल्या भाषणात काही मराठी व उर्दू शेर सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.
यावेळी प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आदी मान्यवर उपस्थित होते.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. दत्ता पाटील यांनी केले.

**कार्यक्रमाचा समारोप**
*"मराठी शेरो-शायरी"* कार्यक्रमाने मराठी भाषेतील विविध काव्यप्रकारांची ओळख आणि त्यातील सौंदर्य रसिकांपर्यंत पोहोचवले. मराठी भाषेच्या वैभवाची जाणीव करून देत, हा उपक्रम रसिकांच्या मनावर अमिट ठसा उमटवून गेला.

# ‘Marathi Sher-o-Shayari’ Program Report

**Date:** 01 January 2025
**Venue:** Academic Auditorium, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
**Organizer:** Kusumagraj Chair, Yashwantrao Chavan Maharashtra Open University

## Introduction

To mark the occasion of welcoming the New Year and in memory of the Marathi poet and shayar, the late Bhausaheb Patankar, the Kusumagraj Chair of Yashwantrao Chavan Maharashtra Open University organized a program titled *"Marathi Sher-o-Shayari."* This event, which celebrated the rich tradition of the Marathi language, was held on Wednesday, 1 January 2025, at the Academic Building Auditorium of the University.

## Program Details

The performance was presented by one-man artist Mr. Mukund Dixit from Malegaon. With his captivating presentation, he moved the audience through the medium of Marathi Sher-o-Shayari.

In his address, Dixit stated that Marathi is *"a language that can outshine even nectar."* He also noted that although Marathi Sher-o-Shayari is a relatively recent form of poetry, the language has been enriched over time by a variety of poetic forms such as bhavgeet (emotive songs), bhaktigeet (devotional songs), gawalan (songs of cowherds), balgeet (children’s songs), lullabies, love songs, lavani, and Japanese haiku.

Notably, the program featured the recitation of select Sher-o-Shayari by the late Bhausaheb Patankar, paying him a heartfelt tribute.

## Presence of Dignitaries

The program was chaired by the Vice-Chancellor of the University, Prof. Sanjiv Sonawane, who also contributed to the liveliness of the event by presenting a few Marathi and Urdu couplets in his speech.

On this occasion, Pro-Vice Chancellor Prof. Jogendrasinh Bisen, Registrar Dr. Dilip Bharad, and Finance Officer Dr. Govind Katlakute were present, among other dignitaries. The welcome address was delivered by Dr. Dilip Dhondge, Head of the Kusumagraj Chair. The program was compered by Mr. Datta Patil, who also delivered the vote of thanks.

## Conclusion

The *"Marathi Sher-o-Shayari"* program introduced the audience to the various poetic forms of the Marathi language and conveyed their beauty to literature lovers. By highlighting the glory of the Marathi language, the event left an indelible mark on the hearts of its audience.




मराठी शेरो-शायरी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना दत्ता पाटील.




कार्यक्रमाचे सादरकर्ते श्री. मुकुंद दीक्षित यांचा सत्कार करताना विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड समवेत कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन आणि कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे.




स्वागत व प्रास्ताविक करताना कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे

अध्यक्षीय भाषण करताना विद्यापीठाचे
मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे.






गझल सादरीकरण करताना
श्री. मुकुंद दीक्षित





लोकमत
epaper.lokmat.com
नाशिक, गुरुवार, दि. २ जानेवारी २०२५

# कुसुमाग्रज अध्यासनातर्फे मुक्त विद्यापीठात रंगली मराठी शेरोशायरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात नववर्षानिमित्त व मराठी शायर कवी स्वर्गीय भाऊसाहेब पाटणकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने 'मराठी शेरोशायरी' हा कार्यक्रम पार पडला. मालेगाव येथील एकपात्री कलाकार मुकुंद दीक्षित यांनी हा कार्यक्रम सादर केला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.



विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे उपस्थित होते.दीक्षित यांनी 'अमृतातेहि पैजासी जिंकाणारी' मराठी भाषा असल्याचे सांगितले. मराठी शेरोशायरी हा अलीकडच्या काळातील काव्यप्रकार असला तरी भावगीत, भक्तिगीत, गवळण, बालगीत, बडबडगीत, प्रेमगीत, लावणी, जपानी हायकू अशा विविध प्रकारांमुळे मराठी भाषा समृद्ध होत गेल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी दीक्षित यांनी स्वर्गीय भाऊसाहेब पाटणकर यांच्या काही निवडक शेरोशायरी सादर केल्या. कुलगुरू सोनवणे यांनी देखील आपल्या भाषणात काही मराठी व उर्दू शेर सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. प्रास्ताविक विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दत्ता पाटील यांनी केले.

# <u>कार्यक्रम सदस्य</u>

पुढील सदस्यांनी विवध जबाबदारी सांभाळत हा कार्यक्रम आयोजित केला.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. दिलीप धोंडगे** | **:** | **अध्यासन प्रमुख** |
| श्री. दत्ता पाटील | : | समिती सदस्य |
| श्री. सचिन शिंदे | : | समिती सदस्य |
| कु. ऋषिकेश गांगुर्डे | : | मदतनीस |

**-------------------------------------- समाप्त --------------------------------------**